ORDER
Read & Recorded.

Digitally signed by
YADAV GAJANAN
BHANUDAS
Date: 2025.09.29
17:35:52 +0530

CJSD, Gangakhed.

# विद्यमानं वरिष्ठ दिवाणी न्यायालय गंगाखेड

Exh-15

वाद्पत्र नं.३४२/२०२५

वादी : गंगाबाई

विरुद्ध

प्रतिवादी : प्रकाश वगैरे

वाद: शास्वत निषेध आज्ञा

प्रतिवादी १ [redacted] तर्फे वादी च्या वाद्पत्राचे लेखी निवेदन सादर करण्यात येत आहे.

१. असे की, वादी स प्रस्तुत वाद्पत्र सादर करण्याचे कोणतेही cause of action नाही. वादी ने प्रस्तुत वाद्पत्रात ज्या मागण्या केल्या आहेत त्या मुदतीच्या बाहेर आहेत. वादी चे वाद्पत्र मुदतीत दाखल करण्यात आलेले नाही. वाद्पत्रातील मागणी नं.२ व ३ हि ओर्डेर २३ CPC तहत कायदेशीर नाही. तसेच मागणी नं.३ हि जि डिक्री वाद्पत्र नं.४८/२०२२ यात झाली आहे ती लोकन्यायालयात झाल्यामुळे व त्याचे अवार्ड झाल्यामुळे वादी स प्रस्तुत डिक्री challenge करण्याचा अधिकार नाही. वादीने प्रस्तुत वाद्पत्रात मालकी जाहीर करण्याची मागणी केली आहे, त्यामुळे वादी ने वाद्पत्राच्या कलम १४ यात कोर्ट फीस हि मार्केट किमतीवर दिली नसल्यामुळे प्रथम ती वादी कडून वासूल करून घेण्यात यावी. ओर्डेर ७ रूल ११ CPC तहत प्रथम वाद्पत्रा बाबत चौकशी करून प्रस्तुत वाद्पत्र खर्चासह खारीज करण्यात यावे.

२. असे की, वाद्पत्राचे कलम नं.१ वादी हि बोथी ता.गंगाखेड येथील रहिवाशी आहे हे खरे आहे, परंतु ती शेती करून उपजीविका चालविते हे खोटे आहे. वादी बयोवृद्ध झाल्यामुळे ती नौकर, मोलमजुर यांच्या मदतीने वादग्रस्त शेतीची वहीती करते हे खोटे आहे. या बाबत योग्य ते स्पष्टीकरण नाही. प्रतिवादी हे राणीसावरगाव येथील रहिवासी आहेत हे खरे आहे. पण ते अत्यंत धूर्त व्यक्ती आहेत हे खोटे आहे.प्रतिवादी हुशार आहेत हे काही चूक नाही. प्रतिवादी शेतीचे काम तसेच पौरहित्याचे काम करतात हे खरे आहे.

३. असे की, वाद्पत्राचे कलम नं.२ हे संपूर्णतहः चूक व खोटे आहे. सन २००९ मध्ये प्रतिवादी १ यास कौटुंबिक गरजे करिता वादग्रस्त शेती विक्री करावयाची होती हे वादी चे विधान खोटे आहे. प्रतिवादी १ यांनी वादीची संपर्क साधत वादग्रस्त शेती खरेदी करण्या बाबत विचारणा केली हे वादी चे विहान खोटे आहे. वादी यांना वादग्रस्त शेती विकत घेण्याची गरज असल्याने वादी व प्रतिवादी १ यांच्या मध्ये शेती विक्रीचा अंतिम ठराव झाला हे वादीचे विधान सर्वस्वी खोटे आहे. दिनांक २५/०३/२००९ रोजी प्रतिवादी १ ने वादी च्या हक्कात शेतीचा मोबदला स्वीकारून खरेदीखत नं. ५७२/२००९ हे

करून दिले हे वादीचे विधान सर्वस्वी खोटे आहे. या बाबत अधिक निवेदन मध्ये स्पष्टीकरण देण्यात येत आहे.खरेदी तारखे पासून वादी वादग्रस्त शेतीचा मालक व तावेदार झाला आहे हे वाडीचे विधान सर्वस्वी चूक व खोटे आहे. (प्रतिवादी यांनी वादी च्या विरुद्ध वाद्पत्र नं.६/२०१३ दाखल केले आहे त्यात प्रतिवादी तर्फे निशाणी ५ चा अर्ज विद्यमान कोर्टाने मंजूर करून वादीस वादग्रस्त शेती यात प्रतिवादीच्या ताब्यात अडथळा करू नये म्हणून पाबंद केले आहे.)

४. असे की, वाद्पत्राचे कलम नं.३ हे बे-कायदेशीर व खोटे आहे. खरेदीखत आधारे वादी च्या नावाने फेरफार नं.२१५१ मंजूर झालेला आहे. व वादी वादग्रस्त शेतावर मालकी ताबा ठेऊन आहे हे वादीचे विधान सर्वस्वी खोटे आहे.(सदरील फेरफार हा रद्द करण्यात आला आहे व त्या बाबत रेवेन्यु कार्यालयामध्ये प्रकरण प्रलंबित आहे.)

५. असे की, वाद्पत्राचे कलम नं.४ हे सर्वस्वी चूक व खोटे.आहे. प्रतिवादी १ यांनी वादी विरुद्ध वाईट हेतूने कार्यवाही केली आहे हे वादीचे विधान सर्वस्वी खोटे आहे.वादी च्या कुटुंबातील सदस्य हे शासकीय नौकारीस तसेच सामाजित व शैक्षणिक संस्था चालवीत असलेल्या बाबीचा उहापोह करून प्रतिवादी १ यांनी खोटे, चुकीचे व बनावटी आरोप वादी वर करत वादग्रस्त शेती हडपण्यासाठी अतोनात प्रयत्न केले हे वादी चे संपूर्ण विधान चूक व खोटे आहे. वादी ने त्यांना दाद न दिल्यामुळे प्रतीवादिना स्वतः: च्या व कुटुंबाच्या मदतीने अनेक प्रकारच्या न्यायालइन व महसुली प्रकाराने वादी व तिच्या कुटुंबीयां विरुद्ध केल्या आहेत हे वादीचे विधान सर्वस्वी खोटे आहे. प्रतीवादिनी केलेल्या सर्व कार्यवाया या तथ्यहीन ,खोट्या व बनावटी स्वरूपाच्या असून त्या आधारे प्रतीवादीचा अ प्रामाणिक हेतू वादग्रस्त शेती बलाकावीने हाच आहे हे वादीचे विधान सर्वस्वी खोटे आहे.वादी ने वादग्रस्त शेती खरेदी करीत असताना प्रतिवादी १ सोबत योग्य तो मोबदला देऊन खरेदीखत करून घेतले आहे आणि प्रतिवादी जाणीव पूर्वक सदरील खारेदिखतास वेगवेगळया स्वरूपाचे बनावटी वळण देत आहे हे वादीचे विधान सर्वस्वी खोटे आहे. (प्रतिवादी यांनी त्यांना जे कायदेशीर अधिकार प्राप्त झाले आहेत त्या नुसार वादी व तिच्या कुटुंबा विरुद्ध न्यायालइन व इतर प्रकाराने दाखल कण्यात आली आहेत जि कायदेशीर आहेत.)

वाद्पत्रात जि वादी यांनी दिवाणी व महसूल प्रकाराने बाबत उहापोह केला आहे त्याचे उत्तर खालील प्रमाणे.

i. प्रतिवादी १ व २ यांनी वादी व तिच्या कुटुंबातील सदस्य व इतरान विरुद्ध वाद्पत्र नं.६/२०१३ दाखल केला आहे हे खरे आहे.वास्तविक सदरील वादग्रस्त शेतीशी इतर प्रतीवादीचा हक्क व संबंध नसताना वाद्पत्राला रंगीन वळण देण्या करिता वादी च्या कुटुंबातील व्यक्तींना वाद्पत्रात शारिक केले आहे हे वादीचे विधान सर्वस्वी खोटे आहे. (वाद्पत्र नं.६/२०१३ यात वादी तर्फे लेखी निवेदन सादर केले आहे. त्याच्या विरुद्ध वादी हे कथन करीत आहे.)सदरील वाद्पत्रात वादी हि वयस्कर असल्यामुळे तिच्या वकील साहेबांमार्फात लेखी जवाब दाखल करण्यास विलंब झाल्याचा गैर फायदा घेत प्रतिवादी १ व

२ यांनी फसवणुकीने तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज मंजूर करून घेतला हे वादीचे विधान सर्वस्वी खोटे आहे. (वादी ची हि pleading कायदेशीर नाही कोर्टवर देखील वादी अविश्वास दाखवीत आहे. आज पर्यंत निशाणी ५ चा आदेश यास वरिष्ठ न्यायालयात challenge केलेला नाही.)

ii. प्रतिवादी १ यांनी फेरफार नं. २१५१ रद्द करण्या बाबत उपविभागीय अधिकारी गंगाखेड यांच्या नायायालयात कार्यवाही दाखल केली होती व माननीय उप विभागीय अधिकारी यांनी तो फेर चुकीच्या पद्धतीने रद्द केला हे वादीचे विधान सर्वस्वी खोटे आहे. (माननीय उप विभागीय अधिकारी यांच्या वर देखील चुकीचे आरोप वादी करीत आहे.)

iii. वादी यांनी उपविभागीय अधिकारी यांचा आदेश माननीय अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या कडे challenge केला व त्यांनी सदरील प्रकरण परत निर्णय देण्यासाठी पाठविला हे खरे आहे.

iv. माननीय जिल्हाधिकारी यांच्या आदेशाच्या विरुद्ध प्रतिवादी यांनी आयुक्त कडे रिव्हिजन दाखल केले व त्यांनी जिल्हाधिकारी चा आदेश कायम ठेवला हे खरे आहे.

v. माननीय जिल्हाधिकारी यांच्या आदेश नुसार माननीय उप विभागीय अधिकारी गंगाखेड यांनी परत सर्व चौकशी करून प्रतिवादी १ चे अपील मंजूर केले व वादी चा फेरफार नं.२१५१ हा रद्द केला हे खरे आहे.

vi. माननीय उप विभागीय अधिकारी गंगाखेड यांच्या आदेशास वादी ने परत जिल्हाधिकारी परभणी यांच्या कडे अपील दाखल केले व माननीय जिल्हा धिकारी यांनी वादी चे अपील खारीज केले व फेरफार रद्द चा आदेश कायम ठेवला हे खरे आहे.

vii. वादी यांनी जिल्हाधिकारी चा आदेश आयुक्य यांच्या न्यायालयात रिव्हिजन दाखल करून परत challenge केला व माननीय आयुक्त साहेबांनी रिव्हिजन मंजूर करून फेरफार नं.२१५१ हा कायम ठेवला.

प्रतिवादी १ ने महसूल व दिवाणी न्यायालयात वाद चालू असताना प्रतिवादी ३ च्या नावाने डिक्री आधारे फेरफार नं.२७७९ जो लावला होता तो देखील रद्द केला.(वादी खोटी डिक्री हा जो शब्द वापरीत आहे ते चूक आहे.प्रतिवादी १ ते ३ यांच्यात वडिलोपार्जित शेती मधील झालेल्या वाटणी प्रमाणे माननीय न्यायालयाने दावा नं.२१८/२०१६ यात कायदेशीर डिक्री केलेली आहे.)

viii. आयुक्त औरंगाबाद यांच्या आदेशानुसार तलाठी यांनी वादी च्या नावाने फेर नं.३७०४ हा घेतला होता व तो मंजूर केला हे वादी चे विधान खरे नाही. वादीने तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याशी संगनमत करून अपील च्या मुदतीत सदरील फेर घेतला होता.जो कायदेशीर नाही.

ix. आयुक्त औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेश विरुद्ध प्रतिवादी यांनी महसूल मंत्री मंत्रालय मुंबई यांच्या कडे दुसरे रिव्हिजन दाखल केले आहे व ते सध्या प्रलंबित आहे हे वादी चे विधान खरे आहे.

x. वादी यांच्या नावाने फेर नं. ३७०४ जो घेतला होता तो प[प्रतिवादी ३ यांनी उपविभागीय अधिकारी गंगाखेड यांच्या कार्यालयात challenge केला व माननीय उपविभागीय अधिकारी यांनी सर्व चौकशी करून वादी व प्रतिवादी यांचा पुरावा घेऊन तो रद्द केला आहे हे खरे आहे.

xi. वादी यांनी या आदेशाच्या विरुद्ध जिल्हाधिकारी परभणी यांच्या कडे अपील दाखल केले व सदरील अपील मध्ये खालच्या कोर्टाच्या आदेशात स्थगिती मागितली पण जिल्हाधिकारी परभणी यांनी स्थगिती चा अर्ज ना मंजूर केला. त्या आदेशाच्या विरुद्ध वादी यांनी आयुक्त औरंगाबाद याच्याकडे अपील दाखल केले आहे जे सध्या प्रलंबित आहे हे वादी चे विधान खरे आहे.

**(वाद्पत्रातील जि महसूल प्रकरण बाबत ( i ) ते ( xi ) मध्ये जे विवरण वादी ने केले आहे त्या सर्व कार्यावाह्य या वादी व प्रतिवादी यांना जे कायद्याने हक़्क़ दिलेले आहेत त्या नुसार करण्यात आले आहेत.या कार्यावाह्य pleading च्या व्याख्येत येत नाहीत व या मुळे कोणाच्याही कायदेशीर हक़्क़ावर बाधा पोहचू शकत नाही. कोर्टाची सहानभूती मिळावी म्हणून हे विवरण केल्याचे दिसून पडते.)**

६. असे की, वाद्पत्रातील कलम नं.५ हे संपूर्णता: बे-कायदेशीर आहे. महसूल न्यायालयात फेरफार बाबत वाद चालू असताना तसेच वाद्पत्र नं.६/२०१३ हे प्रलंबित असताना प्रतिवादी १ ते ४ यांनी धूर्तपणे व चाणाक्ष पणे न्यायालयाची फसवणूक करून प्रकरणात गुंतागुंत करण्यासाठी व कागदोपत्री पुरावा तयार करण्यासाठी न्यायालय सोबतच फ्रौड करून प्रतीवादिनी त्याच्या कुटुंबाच्या नावाने वेगवेगळ्या बनावटी खोट्या व लबाडीने डिक्री हस्तगत केली आहे हे वादी चे विधान सर्वस्वी खोटे आहे. अशा स्वरूपाच्या दीक्रीस कायद्याने महत्व नाही हे वादी चे विधान चूक व खोटे आहे.कायद्याने महत्व नसताना देखील महासून न्यायालय मात्र सदरील आदेश हे दिवाणी न्यायालयाचे असल्यामुळे त्यास अंतिम आदेश मानून त्या आदेशाच्या प्रभावाखाली वादी यांच्या प्रकरणातील गुणवत्तेवर कोणत्याही प्रकारे सारासार विचार करीत नसून दिवाडी न्यायाल्याच्या नवा खाली मनमानी प्रकरणाने महसूल प्राधिकरण आदेश पारित करीत आहेत हे वादी चे विधान हे वादी चे विधान सर्वस्वी खोटे आहे.(येथे वादी विद्यमान न्यायालयाचा तसेच महसूल न्यायालयाचा अपमान करीत आहे. याबाबत महसूल न्यायालयाचा कोणताही आदेश वादी तर्फे दाखल केलेला नाही.)

७. असे की, वाद्पत्राचे कलम नं.६ हे चूक खोटे व बे-कायदेशीर आहे.प्रतीवादिनी संगन मताने बनावटी व फ्रौड करून डिक्री केल्या आहेत हे खोटे आहे. वाद्पत्र नं. २१८/२०१६ मध्ये प्रतिवादी १ याचा सतीश हा मुलगा असून तो प्रतिवादी १ चा भाऊ सदाशिव यांनी दत्तक घेतले होते. दत्तक गेलेल्या मुलाने प्रतिवादी १ च्या विरुद्ध वाटणीचे वाद्पत्र दाखल केले सदरचे वाद्पत्र त्यांनी कुटुंबातील सर्वांच्या विरुद्ध दाखल केले व लगेच एक महिन्याच्या कालावधी मध्ये तडजोडी अंती संपुष्टात आणण्यात आला हे खरे आहे. सदरील वाद्पत्रात वादग्रस्त मिळकत ही वादी (गंगाबाई) यांच्या मालकी ताब्यात आहे त्यांना त्या प्रकरणात पक्षकार करण्यात आलेले नाही(वादी ला पक्षकार करणे कायदेशीर नाही कारण ती वाग्रस्त शेतीची कायदेशीर मालक व काबीज नाही.) सदरील डिक्री हि वादी वर बंधन कारक नाही हि मागणी प्रस्तुत वाद्पत्रात केली आहे ती मागणी बे-कायदेशीर आहे व मुदतीच्या बाहेर आहे. वाद्पात्र नं. २१८/२०१६ यात तडजोड होताना वाद्पत्र नं. ६/२०१३ हे प्रलंबित होते व सदरील तडजोड पत्रा मध्ये याबाबत उल्लेख केलेला नाही. हे वाडीचे विधान चूक व खोटे आहेप्रतिवादी ३ हे दत्तक गेल्यामुळे त्यांना जल्म दात्याच्या मिळकती मध्ये कोणत्याही प्रकारचा हक्क , अधिकार व संबंध राहत नाही हे वादी चे म्हणणे चूक व खोटे आहे. दत्तक गेलेल्या मुलास प्रतिवादी १ यांनी दिलेली बाटणी हि बे-कायदेशीर आहे. हे वादी चे विधान चूक व खोटे आहे.(वादग्रस्त शेती व बिन वादग्रस्त शेती हि प्रतिवादी १ ते ४ यांची वडिलोपार्जित व एकत्र कुटुंबातील शेती असल्यामुळे प्रतिवादी सतीश यांनी बाटणीचे वाद्पत्र दाखल केले होते.)

वरील सर्व उठाठेव करण्या मागील प्रतीवादीचा हेतू की, वादी च्या मिळकती बाबत अधिक अधिक गुंतागुंत निर्माण करणे हाच होता हे वाडीचे विधान बे-कायदेशीर व खोटे आहे. सदरची बनावटी तडजोड करण्यात आली हे वादी चे विधान खोटे आहे. वादी व प्रतिवादी १ यांच्या मध्ये महसूल प्रकाराने प्रलंबित होती हे खरे आहे ती आज तारखेत देखील प्रलंबित आहेत.

८. असे की, वाद्पात्रातील कलम नं.७ हे बे-कायदेशीर आहे. प्रतिवादी यांनी संगण मताने प्रतिवादी ३ चा मुलगा प्रतिवादी ४ याच्या मार्फत त्याच्या आईस पालक दाखवून प्रतिवादी ३ विरुद्ध वाटणीचे वाद्पत्र नं. ४८/२०२२ हे दाखल केले. हे वादी चे विधान संगण मताने दाखल केले इतक्या हद्दी पर्यंत खोटे आहे. सदरील वाद्पत्रात बनवावी तडजोड करून दावा संपुष्टात आला हे वादी चे विधान बनावटी शब्दाच्या हद्दी पर्यंत खोटे आहे. सदरील वाद्पत्रात वाद्पत्र नं.६ /२०१३ बाबत उल्लेख करण्यात आला नाही. हे वादी चे म्हणणे बे-कायदेशीर आहे. सन २०१७ मध्ये प्रतिवादी ३ हा वाद्पत्र नं. ६/२०१३ यात आवश्यक पक्षकार झाल्यामुळे कोर्टाच्या आदेश नुसार शारिक झालेला आहे. त्या वेळेस वादीने प्रस्तुत उजर जो घेतला आहे तो घेतलेला नाही व आता after thought बे कायदेशीर उजर वादी घेत आहे. वाद्पत्र नं.४८/२०२२ बाबत अधिक निवेदन मध्ये सविस्तर उत्तर देण्यात येत आहे.

९. असे की, वाद्पत्राचे कलम नं.८ हे बे-कायदेशीर आहे. प्रतिवादी ४ हा अज्ञान आहे हे खरे आहे. केवळ प्रकरण मध्ये गुंतागुंत निर्माण करण्यासाठी दुसरी बनावटी डिक्री प्रतीवादिनी संगनमत करून व न्यायालयाची दिशाभूल करून हस्तगत केली आहे हे वादी चे विधान चूक खोटे व बे-कायदेशीर आहे.प्रतीवादिनी वादी च्या मालकी ताब्यातील मिळकती बाबत कोर्ट डिक्री करून घेत राहिले हे वादी

चे विधान बे-कायदेशीर आहे.(वादी हि वादग्रस्त मिळकतीची कायदेशीर मालक व काबीज कधीच नव्हती व नाही) प्रतिवादी १ यांनी वादपत्र नं ६/२०१३ हे प्रलंबित ठेवत राहिले हे वादी चे विधान खोटे आहे.(प्रस्तुत वाद्पत्र प्रतीवादिच्याच मुळे प्रलंबित राहिले आहे.) सदरील वाद्पत्रात प्रतिवादी १ ने वादग्रस्त शेती हस्तांतर करू नये असा आदेश झाला असताना प्रतिवादी १ हाच कोर्ट डिक्री आधारे शेती हस्तांतरित करीत आहे हे वाडीचे विधान खोटे व बे-कायदेशीर आहे.(वादी ने प्रतिवादीच्या कायदेशीर ताब्याला अडथला करू नये म्हणून वादी स पाबंद केले आहे.)प्रतिवादी ते ३ हे न्यायालयाची फसवणूक करून वाद्पत्र नं.६/२०१३ यात साक्षपुरावा देत आहेत हे वादी चे विधान चूक व खोटे आहे.( वादी च्या शपथे वरील पुराव्यास प्रतिवादी तर्फे क्रॉस करण्यात आलेली आहे. त्यात या बाबतचा जिकर नाही.) प्रतिवादी ४ हा वाद्पत्र नं.६/२०१३ यात प्रस्तुत वाद्पत्राच्या pleading नुसार तो शारिक होत आहे. महसूल प्रकरणे आज तागायत प्रलंबित आहेत. कोर्ट डिक्री आधारे मिळकत हस्तांतर झाली तरी प्रकरणे बिनधास्त प्रतिवादी १ हे चालवीत आहेत हे वादीचे विधान चूक खोटे आहे. (वादी हि कधीच वादग्रस्त शेतीची कायदेशीर मालक व काबीज नसल्यामुळे जरी डिक्री आधारे मिळकत हस्तांतर झाली तरी वाद्पत्रा मधील ज्या मागण्या प्रतिवादी १ ने मागितल्या आहेत त्यास कोणती ही बाधा पोहचू शकणार नाही.)

१०. असे की, वाद्पत्राचे कलम नं. ९ हे बे-कायदेशीर आहे .प्रतिवादी ४ च्या हक्कात झालेल्या बनावटी डिक्री चा फायदा घेत दुसऱ्या महसुली प्रकरणाच्या कार्यवाही सुरु केल्या हे वादी चे विधान बे-कायदेशीर आहे. (प्रतिवादी ४ यास जे काही कायद्याने अधिकार प्राप्त झाले आहेत त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.) वादी यांच्या पहिल्या कार्यवाही मध्ये आदेश नुसार फेरफार नं.३७०४ हा प्रतिवादी ४ यांनी त्याच्या कार्यवाही मध्ये challenge केला व त्या मध्ये तो यशस्वी झाला हे वादी चे विधान बे-कायदेशीर आहे. महसूल न्यायालय हे निष्कारण पणे प्रतिवादी यांनी संगण मताने हस्तगत केलेल्या कोर्ट डिक्री ला प्रभावित होऊन वादी च्या प्रकारातील गुणवत्तेला संपूर्णपणे दुर्लक्षित करीत आहेत हे वादी चे विधान खोटे व बे-कायदेशीर आहे. महसूल न्यायालय हे सारासार विचार देखील करीत नाहीत हे वादी चे विधान बे-कायदेशीर आहे. (प्रतिवादी ४ ला महसूल अधिकार्यांनी चौकशी करून न्याय दिला आहे.) सदरच्या कोर्ट डिक्री मध्ये वादी यांना पक्षकार केलेले नाही याचे कारण ते आवश्यक पक्षकार नाहीत. वादी च्या हक्कातिल खरेदीखत आज पर्यंत कोणत्याही न्यायालयाने रद्द केलेले नाही. (वादी च्या हक्कातिल खरेदीखत हें against public policy , without consideration , कायद्याच्या विरोधातील असल्यामुळे ते बे-कायदेशीर आहे त्याला रद्द करण्याचे कारण नाही)महसूल न्यायालय हे खोट्या व बनावटी डिक्री च्या प्रभावाखाले येऊन वादी चे हक्क व अधिकार डावलत असल्या कारणाने वादी नी सदरील हुकुमनामे अव्ह्यानीत केले आहेत.(वादी नि वाद्पत्र नं.६/१३ यात प्रतीवाद्पत्र दाखल केलेले नाही.प्रस्तुत वादपत्रातील मागण्या या मुदतीच्या बाहेर आहेत व ओर्डेर २ रूल २ CPC तहत कायदेशीर नाहीत.)

११. असे की, वाद्पत्राचे कलम नं. १० प्रतीवादिनी आपसात संगनमत करून प्रकरणात गुंतागुंत निर्माण करण्याच्या वाईट हेतूने सदरच्या डिक्री ह्या न्यायालयाची फसवणूक करून हस्तगत केल्या

आहेत हे वादी चे विधान खोटे व बे कायदेशीर आहे.न्यायालयात वाद मिळकती बाबतवाद प्रलंबित आहे. तसेच महसूल न्यायालया मध्ये देखील वाद प्रलंबित आहे. हे वादी चे विधान खरे आहे.(दोघांमध्ये त्यांना जे कायदेशीर हक्क मिळाले आहेत त्या नुसार ती प्रकारने प्रलंबित आहेत.) वादी च्या हक्कातिल खरेदीखत रद्द झालेले नाही व हि गोष्ट प्रतिवादीला माहित असताना त्यांनी संगण मताने बनावटी हुकुमनामे हस्तगत केले आहेत हे वादी चे विधान खोटे व बे-कायदेशीर आहे.(विद्यमान कोर्टाने चौकशी करून प्रतिवादी च्या हक्कात हुकुमनामे मंजूर केले आहेत.सदरील हुकुमनामे हे लोकन्यायालयात मंजूर झाल्यामुळे त्यास वादी पक्षकार नसल्यामुळे वादीस कायद्याने challege करता येऊ शकत नाही.)सदरील झालेल्या डिक्री बाबत वादीस वाद्पत्र नं.६/२०१३ मध्ये लेखी निवेदना द्वारे तसेच प्रतीवाद्पत्र सादर करून तसेच शपथेवर साक्ष पुरावा देऊन मांडले नसल्यामुळे आता after thought मुदती बाहेर वादीस मांडता येणार नाही.)

१२. असे की, वाद्पत्राचे कलम नं.११ हे सर्वस्वी खोटे व बे-कायदेशीर आहे. वादपत्र नं.६/२०१३ यात वादी योग्य तो सहभाग घेत असतो हे वादी चे विधान खोटे आहे. वादी च्या हक्कात आयुक्त यांनी आदेश केला असताना प्रतीवादिनी प्रस्तुत वाद पत्रात गुंतागुंती करून डिक्री मंजूर करून घेतल्या हे वादी चे विधान बे-कायदेशीर आहे. कोर्टाच्या डिक्री चा प्रभाव हा महसूल न्यायालयावर पडत आहे हे वादी चे विधान बे-कायदेशीर आहे. तसेच महसूल न्यायालयावर आरोप करणारे आहे.वादी नि वादग्रस्त शेतीची मालकी घोषित करण्याची मागणी केलेली आहे पण सदरची मागणी करण्याचा अधिकार हा वादीने नष्ट केला आहे. सदरची मागणी ही वाद्पत्र नं.६/२०१३ बाबत जेव्हा वादीस प्रथम माहिती झाली त्या नुसार मुदती बाहेर आहे.

१३. असे की, वाद्पत्राचे कलम नं.१२ हे खोटे व बे-कायदेशीर आहे.प्रतिवादी १ व २ यांनी वादी व इतरां विरुद्ध वाद्पत्र नं.६/१३ हे दाखल केला आहे. सदरील वाद्पत्रात प्रतिवादी ३ हा विद्यमान कोर्टाच्या आदेशानुसार शारिक झालेला आहे.प्रतिवादी १ ते ३ यांना वादग्रस्त शेती बाबत कोणताही अधिकार शिल्लक नाही. हे वाडीचे विधान खोटे व बेकायदेशीर आहे. प्रस्तुत वाद्पत्र हे आता निष्फळ झालेले आहे हे वादी चे विधान बे-कायदेशीर आहे.( वाद्पत्र ६/१३ मधील मागण्या ह्या निष्फळ झालेल्या नाहीत व होऊ शकत नाहीत.) वादी प्रतिवादी ४ विरुद्ध वादपत्र चालविण्याची परवानगी साठी अर्ज देत आहे जे कायदेशीर आहे.

१४. असे की, वाद्पत्राचे कलम नं.१३ हे कपोलकल्पित आहे.वादी स प्रस्तुत वाद्पत्र देण्यासाठी कोणतेही cause of action नाही.प्रस्तुत वाद्पत्रात ज्या मागण्या वादीने मागितल्या आहेत त्या मुदतीच्या बाहेर आहेत.तसेच ओर्डेर २३ CPC तहत मागणी नं.२ हि वादीस मागण्याचा अधिकार नाही.तसेच मागणी नं.३ मधील डिक्री हि लोकन्यायालयात झाल्यामुळे वादीची मागणी नं.३हि कायदेशीर नाही.मागणी नं.१ ते ४ च्या मागण्या वादी वाद्पत्र नं.६/२०१३ प्रतिवादपत्र दाखल करून कायदेशीर पाने मागू शकतो पण ते मागितल्यामुळे वादीस आता प्रस्तुत वाद्पत्रात त्या मागण्या मागू

शकत नाही म्हणून वादी स कोणतेही वाद्पत्र सादर करण्यास कोणतेही cause ऑफ action नाही वादीने दिनांक ०८/०६/२०२५ रोजी प्रतिवादीने त्यास नकार दिला हे खोटे लिहिलेले आहे.

१५. असे की, वाद्पत्राचे कलम नं.१४ याबाबत प्रतिवादीचे म्हणणे असे आहे की, वादी ने विद्यमान कोर्टाच्या अधिकार क्षेत्रासाठी वाद्पत्राचे मूल्य हे कमी दाखविलेले आहे. तसेच वादी ने जे बे-कायदेशीर खरेदीखत आधारे मागणी मागितली आहे त्या खरेदी खतातील रकमेवर तसेच सध्याच्या वादग्रस्त शेतीच्या बाजारी मूल्यावर कोर्ट फीस दिलेली नाही या मुद्यावर प्रथम चौकशी होऊन वादी कडून योग्य ती कोर्ट फीस वसूल करून घेण्यात यावी.

१६. असे की, वाद्पत्राचे कलम नं. १६ हे खोटे आहे. वादी ने वाद्पत्रात ज्या मागण्या मागितल्या आहेत त्या मुदती बाहेर आहेत तसेच ओर्डेर २ रूल २ CPC तहत कायदेशीर नाहीत.

## अधिक निवेदन

१७. असे की, वादी चे वाद्पत्र हे maintanable नाही. वादी ने प्रस्तुत वाद्पत्रात विद्यमान कोर्टवर तसेच महसूल न्यायालयावर गंभीर आरोप केलेले आहेत. विद्यमान न्यायालयात जि काही प्रकरणे वाद व विनंती मधील झालेले आहेत त्या बाबत जेव्हा वादीस cause of action निर्माण झाले त्या मुदती नंतर मागण्या मागितल्या आहेत. तसेच वाद्पत्र नं. ६/१३ हे प्रलंबित असताना वेगळे वाद्पत्र प्रस्तुत दाखल करून वादी विद्यमान कोर्टाची दिशाभूल करीत आहे.इतकेच नव्हे तर माननीय महसूल न्यायालयावर देखील वादी गंभीर आरोप करीत आहे. जि काही प्रकरणे न्यायालयात तसेच महसूल न्यायालयात प्रलंबित आहेत त्या मध्ये आज पर्यंत वादीने प्रस्तुत वाद्पत्रातील pleading प्रमाणे pleading केलेली नाही. न्यायालयात तसेच महसूल न्यायालयात यश येत नाही म्हणून वादीने after thought प्रस्तुत बे-कायदेशीर वाद्पत्र दाखल केले आहे.जे ओर्डेर ७ रूल ११ तहत खारीज करणे न्यायचे आहे.

१८. असे की, वाद्पत्र नं.६/२०१३ यात प्रतिवादीच्या मालकी ताब्यातील वादग्रस्त शेती मध्ये वादी किंवा तिच्या सहकार्याने अडी अडथळा करू नये म्हणून वादी व प्रतिवादीच्या समक्ष चौकशी होऊन वादीस व वाद्पत्र नं.६/१३ मधील इतर प्रतीवादिना पाबंद केले आहे. तो आदेश अद्याप कायम आहे. कोणत्याही वरिष्ठ न्यायालयाने तो आदेश रद्द केलेला नाही. वाद्पत्र नं. ६/२०१३ यात प्रतिवादी ४ यांनी त्या वाद्पत्रात त्यास शारिक करून घ्यावे म्हणून अर्ज केला आहे जो प्रलंबित आहे. सदरील वाद्पत्रातील मागण्या ह्या निष्फळ झालेल्या नाहीत कारण वादी च्या हक्कात जे खरेदीखत झाले आहे ते against public policy without consideration कायद्याच्या विरोधातील असल्यामुळे ते बे-कायदेशीर आहे या मागणमुळे ते वाद्पत्र कायद्याने निष्फळ होऊ शकत नाही.

१९.	असे की, वादग्रस्त शेती व बिन वादग्रस्त शेती गट नं.२१९ हि प्रतिवादी यांची वडिलोपार्जित जमीन आहे. प्रतिवादी १ यास सदाशिव नावाचा भाऊ होता व त्यांनी वादी ३ यास दत्तक घेतले होते प्रतीवादी १ हे प्रतिवादी ३ चे जल्मदाते वडील आहेत.प्रतिवादी १ व त्यांचा मयात भाऊ सदाशिव यांच्या मध्ये कधीच वादिलीपार्जीत शेतीमध्ये वाटण्या झालेल्या नाहीत. गुडी पाडवा २०१६ मध्ये प्रतिवादी १ ते ३ तसेच प्रतिवादी १ ची पत्नी प्रफुल्लाबाई व प्रतिवादी १ चा दुसरा मुलगा अमोल यांच्या मध्ये तोंडी वाटण्या झाल्या व त्या वाटणी मध्ये वादग्रस्त गट नं.२१८ संपूर्ण शेती ४ हे.१८ आर हि प्रतिवादी ३ च्या वाटणीत देण्यात आली व इतर बिन वादग्रस्त शेती गट नं.२१९ जि बागायती आहे ही प्रतिवादी २ व त्याचा भाऊ अमोल यांच्या हिस्स्यात देण्यात आली. वाटणी झाल्या नंतर प्रतिवादी ३ च्या वाटणीत आलेल्या शेतीमध्ये प्रतिवादी १ व २ व इतरांनी अडथळा केला व प्रतिवादी ३ च्या मालाकीस नकार दिला म्हणून प्रतिवादी ३ ने वाद्पात्र नं.२१८/२०१६ हे विद्यमान कोर्टात दाखल केले व प्रस्तुत वाद्पत्रात दिनांक १५/१०/२०१६ रोजी प्रतिवादी १ ते ३ व इतरांमध्ये तडजोड करण्यात आली व तडजोड पत्रा आधारे विद्यमान कोर्टाने प्रतिवादी ३ चे वाद्पत्र हे डिक्री केले आहे.सदरील डिक्री नुसार प्रतिवादी ३ हा वादग्रस्त गट नं. २१८ चा मालक झाल्यामुळे त्यांनी वाद्पत्र नं.६/१३ यात वादी म्हणून शारिक करून घेण्याचा अर्ज सादर केला व वादी व प्रतिवादी यांच्या अंतिम युक्ती वादानंतर वाद्पत्र नं.६/१३ यात प्रतिवादी ३ म्हणून सतीश पुराणिक यांना शरिक करून घेण्याचा आदेश विद्यमान कोर्टाने दिला आहे. तो आदेश अद्यापह कायम आहे.

२०.	असे की, वाद्पत्र नं.६/१३ यात प्रस्तुत वाद्पत्रातील प्रतिवादी नं.२ व ३ यांनी शपथेवर साक्ष पुरावा दिला आहे त्यास वादी तर्फे क्रॉस करण्यात आली आहे व सदरील वाद्पत्रात वादी यांनी जे अनेक अर्ज दिले आहेत त्यामुळे सदरील वाद्पत्र प्रलंबित आहे. प्रस्तुत वाद्पत्र यासाठी सादर करण्यात आले आहे की, वादी हिचा मुलगा बाळासाहेब कुंडगिर परभणी येथे शिक्षण अधिकारी म्हणून नौकारीस होता. त्यांनी आपली पत्नी व कुटुंबातील व्यक्तींच्या नावावर मराठवाड्यात अनेक शैक्षणिक संस्था काढल्या आहेत. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षकाची नौकरी देत असताना त्यांच्या कडून तो लाखो रुपयाचे डोनेशन घेऊन नौकरी देत असे. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाकडे डोनेशन साठी आर्थिक परिस्थिती नसल्यास तो त्यांची शेती किंवा इतर property चे खरेदीखत करून त्यांना नौकरीवर घेत असे. प्रतिवादी प्रकाश याचा मुलगा कल्याण हा सुशिक्षित बे-रोजगार होता नौकरी नसल्यामुळे त्याचे लग्न देखील होत नव्हते म्हणून प्रतिवादी १ यांनी वादी च्या मुलाकडे जाऊन कल्याण यास जी संत गाडगेबाबा कनिष्ठ महाविद्यालय वादी च्या मुलाचे आहे त्यात नौकरी देण्यात यावी म्हणून विनंती केली. सदरील कॉलेज चे त्यावेळी प्राचार्य सखाराम बिडगर हे होते. प्रतिवादी प्रकाश व त्याची मुले पौरहीत्याचा भिक्षुकीचा व्यवसाय करीत असल्यामुळे त्यांच्याकडे मुलाच्या नौकरीसाठी डोनेशन देण्याची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे वादी च्या मुलाने प्रतिवादी १ ला अशी अट टाकली की प्रतिवादी १ ने त्यांच्या नावावरील गट नं. २१८ मधील २ एकर जमिनीचे खरेदीखत हे वादी च्या नावाने करून द्यावे व त्या बदल्यात तुम्च्यक्ष मुलाला मी राणीसावरगाव येथील कॉलेज मध्ये नौकारीस घेईल.

२१. असे की, मुलाचे कल्याण होत आहे हे पाहून प्रतिवादी १ ने शेती ची खरेदी विक्रीचे कोणताही व्यवहार न करता शेतीची विक्रीची कोणतेही रक्कम न घेता २ एकर जमिनीचे खरेदीखत वादी च्या हक्कात करून दिले . त्या खरेदीखतावर प्राचार्य सखाराम तसेच प्रतीवादीचा मुलगा सतीश व इतरांनी सह्या केल्या आहेत. सदरील खरेदीखत केल्या नंतर सन २००८ साली वादी च्या मुलाने व संस्थेचे अध्यक्ष वादी ची सून करुनाबाई यांनी प्रतिवादी प्रकाश चा मुलगा कल्याण याला कोणतेही नेमणूक पत्र न देता त्यांच्या संस्थेत प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून कामावर घेतले व तो २००८ पासून २०१२ पर्यंत कामावर ठेवले व २०१२ ला कामातून कमी केले. प्रतिवादी चा मुलगा कल्याण यास वादी चा मुलगा कधी पदवीधर असल्याचे संस्थेच्या पुस्तकात दाखवीत असत इतकेच नव्हे तर त्याचे शिक्षण १२ वि असताना त्यास १० वी चे पेपर तपासण्याचे काम देत असत. परंतु प्रत्यक्ष पेपर तपासणी वेगळेच शिक्षक करीत असत.कल्याण यास इतर अनेक कामे ते देत असत. कॉलेज च्या हजरी पटावर त्याची सही पगार न देताच घेत असत. प्रतिवादी १ ने जे वाद्पत्र दिले आहे त्या वाद्पत्राची नक्कल दाखल करण्यात येत आहे.

२२. असे की, प्रतिवादी १ ने २००९ पासून अनेक वेळा त्याच्या मुलास कायमचे नौकारीचे पत्र द्यावे अशी विनंती केली परंतु ती कधीच देण्यात आले नाही. सन २०११ साली प्रतिवादी १ ने वादी च्या मुलास एकतर कल्याण ला कायमस्वरूपी नौकारीचे आदेश द्यावेत नसता करून दिलेले खरेदीखत रद्द करावे अशी विनंती केली असता वादी च्या मुलाने कल्याण यास नौकारीतून हाकलून दिले. सदरील खरेदीखत हे बे-कायदेशीर असल्यामुळे व खरेदीखत करून दिलेल्या जमिनीवर प्रतिवदि१ चा ताबा असल्यामुळे ते खरेदीखत बे-कायदेशीर असल्याचे जाहीर करण्याचे व प्रतिवादी १ च्या ताब्यात अडी हरकती करू नये म्हणून वाद्पत्र नं.६/२०१३ हे दाखल केलेले आहे.

२३. असे की, प्रतिवादी १ यांनी वादी तसेच वादी चा मुलगा व प्राचार्य यांच्या विरुद्ध त्यांनी बे-कायदेशीर कागदपत्रे तयार करून धोका दिलेला आहे म्हणून गंगाखेड कोर्टात फौजदारी प्रकरण कलम ४१५ ,४१८ ,४२० व इतर तहत दाखल केले आहे.ज्याचा अर्ज नं. ५०/२०१७ असा आहे.ज्यात विद्यमान कोर्टाने दिनांक ३१/०१/२०२५ रोजी आरोपीच्या विरुद्ध कलम ४१५,४१८,४२० ,४२३ ,४६४ ,४६८,४०६,५०४,५०६ कलम ३४ प्रमाणे प्रोसेस issue करण्यात आले आहेत. सोबत आदेशाची प्रत देण्यात येत आहे.

२४. असे की, कॉलेज चे प्राचार्य सखाराम बिडगर यांनी प्रतिवादी च्या विरुद्ध एक खोटा फौजदारी अर्ज दाखल केला होताज्याचा नं.६२/२०१७ असा होता त्यात विद्यमान कोर्टाने चौकशीचे आदेश दिले होते व सदरील प्रकरणात पोलीस खात्याकडून संपूर्ण चौकशी होऊन प्राचार्य सखाराम बिडगर यांनी सदरील फौजदारी अर्ज हा खोटा दिला आहे हे निष्पन्न झाल्यामुळे त्या बाबतचा अंतिम अहवाल दाखल करण्यात आला आहे. प्राचार्य सखाराम यांनी २ एकर चे खरेदीखत होण्या पूर्वी सदरील खरेदीखत हे नोमिनल आहे, नौकरीसाठी हे करून देण्यात आलेले आहे असे कॉलेज च्या लेटर हेड वर त्यांनी

प्रतिवादी १ च्या हक्कात लिहून दिले आहे. ही सर्व कागदपत्रे वाद्पत्र नं.६/२०१३ यात दाखल्ल करण्यात आली आहेत.

## विनंती की,

प्रतिवादींचे लेखी निवेदन स्वीकारून वादीचे वाद्पत्र प्रतिवादी विरुद्ध खर्चासह खारीज करण्यात यावे.

दिनांक : २९/०९/२०२५

प्रतिवादी

प्रकाश गोपाळराव पुराणिक
रा. राणीमावरगाव

## तसदिक

मी प्रतिवादी १ शपथेवर निवेदन करतो की , माझ्या लेखी निवेदन मधील सर्व मजकूर हा खरा 'असुन्ब आज रोजी तसदिक करण्यात येत आहे.

दिनांक : २९/०९/२०२५

प्रतिवादी

प्रकाश गोपाळराव पुराणिक
रा. राणीमावरगाव

तर्फे :
Adv. उदय कि.चौधरी
गंगाखेड

# विद्यमानं वरिष्ठ दिवाणी न्यायालय गंगाखेड

वाद्पत्र नं.३४२/२०२५

वादी : गंगाबाई
विरुद्ध
प्रतिवादी : प्रकाश वगैरे

वाद: शास्वत निषेध आज्ञा

## शपथपत्र

मी प्रकाश गोपाळराव पुराणिक वय ६५ वर्ष धंदा शेती व पोरहीत्य रा. राणीसावरगाव शपथेवर निवेदन करतो की, मी जे लेखी निवेदन दाखल केले आहे ते खरे व बरोबर आहे.वादी चे वाद्पत्र हे maintanable नाही. वादी ने प्रस्तुत वाद्पत्रात विद्यमान कोर्टवर तसेच महसूल न्यायालयावर गंभीर आरोप केलेले आहेत. विद्यमान न्यायालयात जि काही प्रकरणे वाद व विनंती मधील झालेले आहेत त्या बाबत जेव्हा वादीस cause of action निर्माण झाले त्या मुदती नंतर मागण्या मागितल्या आहेत. तसेच वाद्पत्र नं. ६/१३ हे प्रलंबित असताना वेगळे वाद्पत्र प्रस्तुत दाखल करून वादी विद्यमान कोर्टाची दिशाभूल करीत आहे.इतकेच नव्हे तर माननीय महसूल न्यायालयावर देखील वादी गंभीर आरोप करीत आहे. जि काही प्रकरणे न्यायालयात तसेच महसूल न्यायालयात प्रलंबित आहेत त्या मध्ये आज पर्यंत वादीने प्रस्तुत वाद्पत्रातील pleading प्रमाणे pleading केलेली नाही. न्यायालयात तसेच महसूल न्यायालयात यश येत नाही म्हणून वादीने after thought प्रस्तुत बे-कायदेशीर वाद्पत्र दाखल केले आहे.जे ओर्डेर ७ रूल ११ तहत खारीज करणे न्यायचे आहे. वाद्पत्र नं.६/२०१३ यात प्रतिवादीच्या मालकी ताब्यातील वादग्रस्त शेती मध्ये वादी किंवा तिच्या सहकार्याने अडी अडथळा करू नये म्हणून वादी व प्रतिवादीच्या समक्ष चौकशी होऊन वादीस व वाद्पत्र नं.६/१३ मधील इतर प्रतीवादिना पाबंद केले आहे. तो आदेश अद्याप कायम आहे. कोणत्याही वरिष्ठ न्यायालयाने तो आदेश रद्द केलेला नाही. वाद्पत्र नं. ६/२०१३ यात प्रतिवादी ४ यांनी त्या वाद्पत्रात त्यास शारिक करून घ्यावे म्हणून अर्ज केला आहे जो प्रलंबित आहे. सदरील वाद्पत्रातील मागण्या ह्या निष्फळ झालेल्या नाहीत कारण वादी च्या हक्कात जे खरेदीखत झाले आहे ते against public policy without consideration कायद्याच्या विरोधातील असल्यामुळे ते बे-कायदेशीर आहे या मागणमुळे ते वाद्पत्र कायद्याने निष्फळ होऊ शकत नाही. वादग्रस्त शेती व बिन वादग्रस्त शेती गट नं.२१९ हि प्रतिवादी यांची वडिलोपार्जित जमीन आहे. प्रतिवादी १ यास सदाशिव नावाचा भाऊ होता व त्यांनी वादी ३ यास दत्तक घेतले होते प्रतीवादी १ हे प्रतिवादी ३ चे जल्मदाते वडील आहेत.प्रतिवादी १ व त्यांचा मयात भाऊ सदाशिव यांच्या मध्ये कधीच वादिलीपार्जीत शेतीमध्ये वाटण्या झालेल्या नाहीत. गुडी पाडवा २०१६ मध्ये प्रतिवादी १ ते ३ तसेच प्रतिवादी १ ची पत्नी प्रफुल्लाबाई व प्रतिवादी १ चा दुसरा मुलगा अमोल यांच्या मध्ये तोंडी वाटण्या झाल्या व त्या वाटणी मध्ये वादग्रस्त गट नं.२१८ संपूर्ण शेती ४ हे.१८ आर हि प्रतिवादी ३ च्या वाटणीत देण्यात आली व इतर बिन वादग्रस्त शेती गट नं.२१९ जि बागायती आहे ही प्रतिवादी २ व त्याचा भाऊ अमोल यांच्या हिस्स्यात देण्यात आली. वाटणी झाल्या नंतर प्रतिवादी ३ च्या वाटणीत आलेल्या शेतीमध्ये प्रतिवादी १ व २ व इतरांनी अडथळा केला व प्रतिवादी ३ च्या मालाकीस नकार दिला म्हणून प्रतिवादी ३ ने वाद्पात्र

Superintendent C.J.S.D.Court. Gangakhed

नं.२१८/२०१६ हे विद्यमान कोर्टात दाखल केले व प्रस्तुत वाद्पत्रात दिनांक १५/१०/२०१६ रोजी प्रतिवादी १ ते ३ व इतरांमध्ये तडजोड करण्यात आली व तडजोड पत्रा आधारे विद्यमान कोर्टाने प्रतिवादी ३ चे वाद्पत्र हे डिक्री केले आहे.सदरील डिक्री नुसार प्रतिवादी ३ हा वादग्रस्त गट नं. २१८ चा मालक झाल्यामुळे त्यांनी वाद्पत्र नं.६/१३ यात वादी म्हणून शारिक करून घेण्याचा अर्ज सादर केला व वादी व प्रतिवादी यांच्या अंतिम युक्ती वादानंतर वाद्पत्र नं.६/१३ यात प्रतिवादी ३ म्हणून सतीश पुराणिक यांना शरिक करून घेण्याचा आदेश विद्यमान कोर्टाने दिला आहे. तो आदेश अद्यापह कायम आहे.वाद्पत्र नं.६/१३ यात प्रस्तुत वाद्पत्रातील प्रतिवादी नं.२ व ३ यांनी शपथेवर साक्ष पुरावा दिला आहे त्यास वादी तर्फे क्रॉस करण्यात आली आहे व सदरील वाद्पत्रात वादी यांनी जे अनेक अर्ज दिले आहेत त्यामुळे सदरील वाद्पत्र प्रलंबित आहे. प्रस्तुत वाद्पत्र यासाठी सादर करण्यात आले आहे की, वादी हिचा मुलगा बाळासाहेब कुंडगिर परभणी येथे शिक्षण अधिकारी म्हणून नौकारीस होता. त्यांनी आपली पत्नी व कुटुंबातील व्यक्तींच्या नावावर मराठवाड्यात अनेक शैक्षणिक संस्था काढल्या आहेत. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षकाची नौकरी देत असताना त्यांच्या कडून तो लाखो रुपयाचे डोनेशन घेऊन नौकरी देत असे. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाकडे डोनेशन साठी आर्थिक परिस्थिती नसल्यास तो त्यांची शेती किंवा इतर property चे खरेदीखत करून त्यांना नौकरीवर घेत असे. प्रतिवादी प्रकाश याचा मुलगा कल्याण हा सुशिक्षित बे-रोजगार होता नौकरी नसल्यामुळे त्याचे लग्न देखील होत नव्हते म्हणून प्रतिवादी १ यांनी वादी च्या मुलाकडे जाऊन कल्याण यास जी संत गाडगेबाबा कनिष्ठ महाविद्यालय वादी च्या मुलाचे आहे त्यात नौकरी देण्यात यावी म्हणून विनंती केली. सदरील कॉलेज चे त्यावेळी प्राचार्य सखाराम बिडगर हे होते. प्रतिवादी प्रकाश व त्याची मुले पौरहीत्याचा भिक्षुकीचा व्यवसाय करीत असल्यामुळे त्यांच्याकडे मुलाच्या नौकरीसाठी डोनेशन देण्याची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे वादी च्या मुलाने प्रतिवादी १ ला अशी अट टाकली की प्रतिवादी १ ने त्यांच्या नावावरील गट नं. २१८ मधील २ एकर जमिनीचे खरेदीखत हे वादी च्या नावाने करून द्यावे व त्या बदल्यात तुम्च्यक्र मुलाला मी राणीसावरगाव येथील कॉलेज मध्ये नौकारीस घेईल. मुलाचे कल्याण होत आहे हे पाहून प्रतिवादी १ ने शेती ची खरेदी विक्रीचे कोणताही व्यवहार न करता शेतीची विक्रीची कोणतेही रक्कम न घेता २ एकर जमिनीचे खरेदीखत वादी च्या हक्कात करून दिले . त्या खरेदीखतावर प्राचार्य सखाराम तसेच प्रतीवादीचा मुलगा सतीश व इतरांनी सह्या केल्या आहेत. सदरील खरेदीखत केल्या नंतर सन २००८ साली वादी च्या मुलाने व संस्थेचे अध्यक्ष वादी ची सून करुनाबाई यांनी प्रतिवादी प्रकाश चा मुलगा कल्याण याला कोणतेही नेमणूक पत्र न देता त्यांच्या संस्थेत प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून कामावर घेतले व तो २००८ पासून २०१२ पर्यंत कामावर ठेवले व २०१२ ला कामातून कमी केले. प्रतिवादी चा मुलगा कल्याण यास वादी चा मुलगा कधी पदवीधर असल्याचे संस्थेच्या पुस्तकात दाखवीत असत इतकेच नव्हे तर त्याचे शिक्षण १२ वि असताना त्यास १० वी चे पेपर तपासण्याचे काम देत असत. परंतु प्रत्यक्ष पेपर तपासणी वेगळेच शिक्षक करीत असत.कल्याण यास इतर अनेक कामे ते देत असत. कॉलेज च्या हजरी पटावर त्याची सही पगार न देताच घेत असत. प्रतिवादी १ ने जे वाद्पत्र दिले आहे त्या वाद्पत्राची नक्कल दाखल करण्यात येत आहे.प्रतिवादी १ ने २००९ पासून अनेक वेळा त्याच्या मुलास कायमचे नौकारीचे पत्र द्यावे अशी विनंती केली परंतु ती कधीच देण्यात आले नाही. सन २०११ साली प्रतिवादी १ ने वादी च्या मुलास एकतर कल्याण ला कायमस्वरूपी नौकारीचे आदेश द्यावेत नसता करून दिलेले खरेदीखत रद्द करावे अशी विनंती केली असता वादी च्या मुलाने कल्याण यास नौकारीतून हाकलून दिले. सदरील खरेदीखत हे बे-कायदेशीर असल्यामुळे व खरेदीखत करून दिलेल्या जमिनीवर प्रतिवदि१ चा ताबा असल्यामुळे ते खरेदीखत बे-कायदेशीर असल्याचे जाहीर करण्याचे व प्रतिवादी १ च्या ताब्यात अडी हरकती करू नये म्हणून वाद्पत्र नं.६/२०१३ हे दाखल केलेले आहे.प्रतिवादी १ यांनी वादी तसेच वादी चा मुलगा व

प्राचार्य यांच्या विरुद्ध त्यांनी बे-कायदेशीर कागदपत्रे तयार करून धोका दिलेला आहे म्हणून गंगाखेड कोर्टात फौजदारी प्रकरण कलम ४१५ ,४१८ ,४२० व इतर तहत दाखल केले आहे.ज्याचा अर्ज नं. ५०/२०१७ असा आहे.ज्यात विद्यमान कोर्टाने दिनांक ३१/०१/२०२५ रोजी आरोपीच्या विरुद्ध कलम ४१५,४१८,४२० ,४२३ ,४६४ ,४६८,४०६,५०४,५०६ कलम ३४ प्रमाणे प्रोसेस issue करण्यात आले आहेत. सोबत आदेशाची प्रत देण्यात येत आहे. कॉलेज चे प्राचार्य सखाराम बिडगर यांनी प्रतिवादी च्या विरुद्ध एक खोटा फौजदारी अर्ज दाखल केला होताज्याचा नं.६२/२०१७ असा होता त्यात विद्यमान कोर्टाने चौकशीचे आदेश दिले होते व सदरील प्रकरणात पोलीस खात्याकडून संपूर्ण चौकशी होऊन प्राचार्य सखाराम बिडगर यांनी सदरील फौजदारी अर्ज हा खोटा दिला आहे हे निष्पन्न झाल्यामुळे त्या बाबतचा अंतिम अहवाल दाखल करण्यात आला आहे. प्राचार्य सखाराम यांनी २ एकर चे खरेदीखत होण्या पूर्वी सदरील खरेदीखत हे नोमिनल आहे, नौकरीसाठी हे करून देण्यात आलेले आहे असे कॉलेज च्या लेटर हेड वर त्यांनी प्रतिवादी १ च्या हक्कात लिहून दिले आहे. ही सर्व कागदपत्रे वादपत्र नं.६/२०१३ यात दाखल करण्यात आली आहेत. करिता शपथपत्र देत आहे ते खरे व बरोबर आहे.

दिनांक : २६/०९/२०२५

प्रतीज्ञक

प्रकाश गोपाळराव पुराणिक
रा. राणीसावरगाव

## तसदिक

मी प्रतिवादी १ शपथेवर निवेदन करतो की , माझ्या शपथपत्रातील मधील सर्व मजकूर हा खरा व बरोबर बरोबर असून आज रोजी तसदिक करण्यात येत आहे.

दिनांक : २६/०९/२०२५

प्रतिवादी

प्रकाश गोपाळराव पुराणिक
रा. राणीसावरगाव

AFFIDAVIT
Solemnly affirmed before me by Prakash Gopalrao Puranik Age 65 yrs and r/o Ranisawargaon Tq Gangakhed
who is identified before me by Advt V.K. Choudhari
to whom I know personally

26/9/25
Asstt. Superintendent
Civil Judge & JMFC Court
Gangakhed

Exh-16

# विद्यमानं वरिष्ठ दिवाणी न्यायालय गंगाखेड

वाद्पत्र नं.३४२/२०२५

वादी : गंगाबाई

विरुद्ध

प्रतिवादी : प्रकाश वगैरे

वाद: शास्वत निषेध आज्ञा

प्रतिवादी १ तर्फे खालील प्रमाणे पुरसीस देण्यात येत आहे.

असे की, आज रोजी प्रतिवादी तर्फे वाद्पत्राचे लेखी निवेदन दाखल करण्यात येत आहे तेच वादीच्या निशाणी ५ च्या अर्जाचा से म्हणून ट्रिट करण्यात यावा म्हणून हि पुरसीस देण्यात येत आहे.

करिता हि पुरसीस

दिनांक : २९/०९/२०२५ प्रतिवादी

१

तर्फे

Adv. उदय की. चौधरी
गंगाखेड